**L. C. BILL No. XIX OF 2026.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA COEP TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2022.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९.**

**महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :— २०२२ चा महा. ३५.

एचबी ९८५–१

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १९ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १९ मध्ये, पोट-कलम (४) मधील खंड (च) मध्ये, "महाराष्ट्र विद्यापीठे लेखा संहितेनुसार" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेनुसार" हा मजकूर दाखल करण्यात येईल. २०२२ चा महा. ३५.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४३ ची सुधारणा. **३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४३ मध्ये, पोट-कलम (ढ) मधील, "कलम ६० च्या पोट-कलम (६)" या मजकुराऐवजी, "कलम ६० च्या पोट-कलम (६) व (७)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ४४ ची सुधारणा. **४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४४ मध्ये, पोट-कलम (९) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(१०) पूर्वगामी पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, विद्यापीठावर बंधनकारक असतील असे, एकरूप परिनियम विहित करण्याचा अधिकार असेल.".

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५६ ची सुधारणा. **५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५६ मध्ये, खंड (चार) मधील, "खरेदी व विक्री समिती" या मजकुराऐवजी, "खरेदी समिती" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ५९ ची सुधारणा. **६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ मध्ये, पोट-कलम (५) मधील, खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(ङ) विद्यापीठाच्या कामांसाठी अनुभव सिद्ध व गुणवत्ता असलेले तीन ते पाच वास्तुविशारद आणि इतर विशेषीकृत सल्लागार, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार, संरचना सल्लागार, कार्यकारी अभिकरणे यांची एक नामिका तयार करील आणि त्यास नियमक मंडळाकडून मान्यता घेईल;".

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईलः- सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ६० ची सुधारणा.

"(१) विद्यापीठाच्या सर्व खरेदींशी संबंधित असणाऱ्या सर्व बाबी हाताळण्यासाठी एक खरेदी समिती असेल;".

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ७६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, "लेखा संहितेचे" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र विद्यापीठे वित्त व लेखा संहितेचे" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ७६ ची सुधारणा.

(शा.म.मु.) एचबी ९८५–२ (१४०—७-२०२६)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १९.]**

**[महाराष्ट्र सीओइपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**(विधानपरिषदेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक ७ जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**जितेंद्र भोळे,**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.